


# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय,उस्मानाबाद

समर्थ नगर,सांजा रस्ता परिसर,उस्मानाबाद (धाराशिव)
फोन: (०२४७२)-२२७१५९
E-mail:osdvmcollege@gmail.com website: vmcollege.org

Scanned by TapScanner

तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती
ता.जि.उस्मानाबाद संचलित

# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

नॅक मानांकन 'B' दर्जा

कला/विज्ञान/वाणिज्य व बी.सी.ए.




# माहिती पत्रक

20 -20

Scanned by TapScanner

तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट
येवती, ता.जि.उस्मानाबाद संचलित,

# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

## * दृष्टी *

भारत हा व्यासंगी, विवेकी, बुध्दिंमत, सशक्त व निरोगी नागरिकांचा देश आहे, असे आम्ही मानतो. आमची संस्था तांत्रिक व व्यावसायिक कौशल्ये प्रदान करणारे, नैतिक वर्तनाचे धडे देणारे, मूल्यांशी बांधीलकी जपण्याचे शिक्षण देणारे ज्ञानाचे केंद्र असेल.

ग्रामीण तरूण मुले व मुली आपल्या मूलस्थानाची जाणीव ठेवताना वैश्विक क्षमता आत्मसात करतील. आमचे विद्यार्थी स्वतः ची, आपल्या कुटूंबाची, समाजाची व राष्ट्राची उन्नती करतील.

## * कार्य *

आमच्या विद्यार्थ्यांच्या मनात समर्पणाची भावना व उत्कृष्टता जोपासून भारताची समृध्दी वाढविण्यासाठी, सामाजिक हितासाठी ज्ञानदान करणे व ज्ञानाचा पाठपुरावा करणे हे आमचे कार्य आहे. आपण ज्या गोष्टींबद्दल श्रध्दा बाळगतो, त्या गोष्टींना अनुसरून कृती करण्याचे धैर्य अंगी बाळगणाऱ्या, सर्वांप्रती समजूतदारपणा व अनुकंपा असणाऱ्या निर्मितीक्षम व कार्यक्षम मन असणाऱ्या स्त्री पुरूषांचा विकास घडवून आणणे हे आमचे कार्य आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या बौध्दिक, भावनिक, शारीरिक, आत्मिक व सामाजिक विकासासाठी आम्ही कसोशीने प्रयत्न करतो.

## * उद्दिष्ट्ये *

१) स्त्री व पुरूष यांच्यात तांत्रिक, कलात्मक, सामाजिक व वैज्ञानिक क्षमता आणि श्रेष्ठता निर्माण करण्यासाठी शिक्षणास मुक्तद्वार पुरविणे व त्याच बरोबर त्यांच्यात दृढ मूल्यात्मक पाया असणारे चारित्र्य निर्माण करणे.

२) समरसते सोबत व्यक्तिस्वातंत्र्यास प्रोत्साहन देणे.

३) विद्यार्थ्यांच्या चारित्र्यात प्रामाणिकपणा, चातुर्य, युक्तिकौशल्य, प्रेरणा व एकात्मता निर्माण करणे व बिंबविणे.

४) व्यावसायिक कौशल्य निर्माण करणे, आपल्या क्षमतांचा अत्युच्च पातळीपर्यंत विकास करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे.

५) न्याय व रचनात्मक स्पर्धेस प्रोत्साहन देणे.

६) संशोधन व अभ्यासू वृत्तीस प्रोत्साहन देणे.

Scanned by TapScanner



प्रमोदजी महाजन सभागृह व ग्रंथालय



वस्तीगृह



नेटवर्क रिसोर्स सेंटर




ई–लॅयब्ररी



जिममखाना



म्युझियम



ऐतिहासीक वस्तू

Scanned by TapScanner

तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट

येवती, ता.जि.उस्मानाबाद संचलित,

# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

(कला /विज्ञान /वाणिज्य व बी.सी.ए) स्थापना दि.१४.८.१९९९

मान्यता क्रमांक : एन.जी.सी.-३५९९/एन.एम.व्ही./(१/९९) एम.एस.३ (दि.९.७.१९९९)

## * प्रस्तावना *

उस्मानाबाद (धाराशिव) शहरात वरिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या व उपलब्ध महाविद्यालयातील मंजूर विद्यार्थी संख्या याचे व्यस्त प्रमाण लक्षात घेवून ग्रामीण भागातील शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय व्हावी या करता संस्थेने पुढाकार घेवून इ.स.१९९९-२००० सालापासून शहरात व्यंकटेश महाजन वरिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालयाची सुरूवात केली.

राष्ट्रीय विचारांचा प्रभाव असलेले व सामाजिक निर्मिती करणारे शिक्षण देवून स्वाभिमानी व स्वावलंबी विद्यार्थी घडविण्याच्या उद्देशाने शिक्षण क्षेत्रात संस्थेने पहिले पाऊल टाकले आहे. आर्थिक दुर्बलता आणि भौगोलिक प्रतिकुलता यावर मात करत अशासकीय पध्दतीने शिक्षणातून समाज परिवर्तन करण्याचे दायित्व संस्थेने स्वीकारले आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण मिळावे व या करिता संगणकशास्त्र (Computer Science) सुक्ष्मजीवशास्त्र (Microbiology) हे विषय संस्थेने उपलब्ध करून दिले आहेत.

करिअरच्या वाढीव संधी विद्यार्थ्यांना मिळाव्यात यासाठी भूगोल विषय पदवी स्तरावर उपलब्ध आहे. ज्यांचे विचार संपूर्ण विश्वासाठी मार्गदर्शक आहेत, अशा महात्मा ज्योतीबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवरील विषय पदवी अभ्यासक्रमामध्ये अंतर्भूत केला आहे.

सर्व वयोगटातील स्त्री पुरूषांसाठी खुला असणारा, स्त्री इतिहास आणि वर्तमानासंबंधी जागृती निर्माण करणारा तीन महिने कालावधी असणारा स्त्री अभ्यास प्रमाणपत्र अभ्यासक्रम महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २००७-२००८ पासून सुरू करण्यात आला आहे.

संस्थेच्या सर्व उद्दिष्टांना नजरेसमोर ठेवून विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. पुढील काळात याच गतीने कार्यशील राहण्याचा संस्थेचा निर्धार आहे. या वाटचालीत आपला सहयोग मिळेल, याचा आम्हास विश्वास आहे.

| | |
|---|---|
| **ॲड.श्री.मिलिंद शं.पाटील** | **डॉ.प्रशांत गुणवंतराव चौधरी** |
| सचिव | प्राचार्य |
| **तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट** | **व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय** |
| येवती ता.जि.उस्मानाबाद (धाराशिव) | उस्मानाबाद (धाराशिव) |



Scanned by TapScanner

## विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) च्या सहाय्याने कार्यान्वित असणारे उपक्रम

१) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र.

२) विद्यार्थिंनी वसतिगृह उपलब्ध.

३) विद्यार्थ्यांच्या विकासासाठी करिअर आधारित विशेष अभ्यासक्रम :

४) **Language Laboratary**

## शिवार हेल्पलाईन केंद्र

उस्मानाबाद जिल्हयातील शेतकरी आत्महत्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता महाविद्यालयाने सामाजिक जाणिवेचा एक भाग म्हणून ह्या गंभीर प्रश्ना बाबत काही कार्य करण्याचे ठरविले आहे. मा.संस्था प्रतिनिधींच्या सूचना आणि सल्ल्यानुसार महाविद्यालयात शिवार हेल्पलाईन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. शेतकरी बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी तसेच मानसिक पाठबळ व समुपदेशन मिळवून देण्यासाठी केंद्र प्रयत्न करीत आहे. शिवार फाउंडेशन संचलित शिवार संसद व व्यंकटेश महाजन महाविद्यालय यांचा हा संयुक्त उपक्रम आहे. शिवार हेल्पलाईन क्र.८९५५७७१११५ हा आहे. सोमवार ते शनिवार, सकाळी १० ते सायं.६ या वेळेत हेल्पलाईन तसेच केंद्राचे काम सुरू असेल.

**महाविद्यालय समन्वयक**
**प्रा. गोरे अशोक रामचंद्र**



Scanned by TapScanner

# * अन्य पारितोषिक

| अ.क्र. | विभाग | स्वरूप | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | इंग्रजी | कै.दुर्गादेवी ग्यानुराव साळुंके यांच्या स्मृती प्रित्यर्थ पारितोषिक | |
| | | १. ऐच्छिक तृतीय वर्ष-प्रथम | १५००/-रोख |
| | | २. ऐच्छिक तृतीय वर्ष - द्वितीय | १०००/-रोख |
| | | ३. ऐच्छिक तृतीय वर्ष - तृतीय | ५००/-रोख |
| २. | हिंदी | १. द्वितीय भाषा प्रथम येणाऱ्यास | ५००/- रोख |
| | | २. ऐच्छिक मध्ये प्रथम येणाऱ्यास | ५००/- रोख |
| | | ३. स्पेशलायझेशन मध्ये प्रथम येणाऱ्यास | ५००/- रोख |
| ३. | मराठी | कै.प्रा.विक्रम इरमले स्मृती पुरस्कार | |
| | | १. ऐच्छिक तृतीय वर्ष प्रथम | ५००/- रोख व प्रमाणपत्र + स्मृतीचिन्ह |
| | | २. ऐच्छिक तृतीय वर्ष द्वितीय | ५००/- रोख व प्रमाणपत्र + स्मृतीचिन्ह |

* तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती मार्फत बी.ए., बी.एस्सी व बी.सी.ए. प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष व तृतीय वर्षात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रत्येकी रूपये ५००/- चे पारितोषिक.



Scanned by TapScanner

## * ग्रंथालयामध्ये उपलब्ध सोयी सुविधा :

१. सुसज्ज व प्रशस्त ग्रंथालयीन कक्ष, ई ग्रंथालय व इंटरनेट सुविधा उपलब्ध.

२. अभ्यासक्रम व अभ्यासकमेत्तर १३,२०० पुस्तके.

३. स्पर्धा परिक्षेकरिता आवश्यक पुस्तकांची उपलब्धता.

४. N.List यांची ई बुक्स व ई.जर्नल्सची उपलब्धता.

५. स्वतंत्र अभ्यास कक्ष.

६. प्रतिलिपी(Photo Copy) सुविधा उपलब्ध

## * महाविद्यालयात स्त्री अभ्यास प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुविधा :

महाविद्यालयामार्फत दरवर्षी जुलै ते डिसेंबर दरम्यान स्त्री – अभ्यास प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यार्थी – विद्यार्थीनींसाठी निःशुल्क शिकविला जातो. हा अभ्यासक्रम शिकविण्यापाठीमागील भूमिका विद्यार्थ्यांमध्ये स्त्रीयांच्या समस्या, अडचणी विषयीची तसेच त्यांच्या अधिकारांविषयी जाणिव निर्माण व्हावी हीच अपेक्षा आहे. अभ्यासक्रम शिकविल्यानंतर एक मुख्य परीक्षा घेतली जाते. परीक्षेत प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक व प्रमाणपत्र वितरीत केले जाते.

## * ऐतिहासिक वस्तु संग्रहालय :

ऐतिहासिक व पुरातत्वीय वस्तुच्या माध्यमातून प्रात्यक्षिक अध्यापन सुविधा

## * क्रीडा व (Sports)सुविधा :

सुसज्ज व्यायामशाळा, इनडोअर व आऊटडोअर खेळांची सोय.



Scanned by TapScanner

# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

## (कला व विज्ञान)

## (डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्न)

## * महाविद्यालयाच्या नियमाबाबत *

प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी संपूर्ण माहिती पुस्तक नीट वाचावे. त्यातील सर्व नियम मान्य व मंजूर असतील तरच त्यांनी या महाविद्यालयात प्रवेश घेण्याकरिता अर्ज करावा. महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास महाविद्यालयाचे सर्व नियम मान्य आहेत असे गृहीत धरण्यात येईल.

शासन निर्णय शिक्षण विभाग क्र. एमाआयएस१०७४/१३०३ एम. दिनांक : २७ जून १९९४ अन्वये मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीप्रमाणे मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश मिळेल.

**राखीव जागांचे आरक्षण खालीलप्रमाणे राहील.**

| | | |
|---|---|---|
| १. | एस.सी. | १३% |
| २. | एस.टी. | ७% |
| ३. | एन.टी. १४ जाती (कास्टस) | ३% |
| ४. | व्ही.जे.एन.टी (२८ जाती १९९० पूर्वीच्या) | २.५% |
| ५. | व्ही.जे.एन.टी. (धनगर व तत्सम जमाती) | ३.५% |
| ६. | व्ही.जे.एन.टी. (वंजारी व त्यांच्या तत्सम जमाती) | २% |
| ७. | ओ.बी.सी. | १९% |
| ८. | एस.बी.सी. | २% |
| | एकूण | ५२% |

प्रथम प्रवेश अर्ज स्वीकारले जातील. त्यानंतर छाननी करून गुणवत्तेप्रमाणे व आरक्षणाप्रमाणे यादी जाहीर केली जाईल. मूळ प्रमाणपत्रे सादर केल्यावरच प्रवेश कायम होईल.

विद्यापीठाच्या वेबसाईटवर online registration करता येईल.



Scanned by TapScanner

# महाविद्यालयातील अभ्यासक्रम

## कला शाखा

* **बी.ए.प्रथम वर्ष**

अ) **अनिवार्य विषय**

१) इंग्रजी

२) मराठी / हिंदी (द्वितीय भाषा) S.L.

३) संगणकशास्त्र

ब) **ऐच्छिक विषय**

(खालीलपैकी प्रत्येक गटातून एक असे फक्त तीन विषय)

१) मराठी / हिंदी / इंग्रजी

२) अर्थशास्त्र / महात्मा फुले व आंबेडकर विचारधारा

३) समाजशास्त्र / राज्यशास्त्र / भूगोल

४) इतिहास

* **बी.ए.द्वितीय वर्ष**

अ) **अनिवार्य विषय**

१) इंग्रजी

२) मराठी / हिंदी (द्वितीय भाषा)

३) पर्यावरणशास्त्र

ब) **ऐच्छिक विषय**

१) बी.ए. प्रथम वर्षाचेच विषय बी.ए. द्वितीय वर्षासाठी राहतील.

* **बी.ए. तृतीय वर्ष**

प्रथम व द्वितीय वर्षासाठी घेतलेले तीन ऐच्छिक विषय बी.ए. तृतीय वर्षासाठी राहतील.

भूगोल विषय कायम विना अनुदानित असल्यामुळे प्रयोगशाळा शुल्क प्रती सेमीस्टर ५००/- शुल्क आकारले जाईल.



Scanned by TapScanner

(वाणिज्य शाखा)

# Syllabus - Bachelor of Commerce

## Choice Based Credit System (CBCS) - 2018-19

| Semester & Credits | Core Course (4) | Ability Enhancement Compulsory Courses [AECC] (02) | Discipline Specific Elective [DSE] (01) |
|---|---|---|---|
| I<br>Credit 28 | 1. Financial Accounting-I<br>2. Business Mathematics & Statistics<br>3. Business & Industrial Economics<br>4. Computer Application in Business - I | 1. English<br>2. Second Languages Marathi / Hindi | Elective Paper [Any One]<br>1. Entrepreneurship Development - I<br>2. Office Management |

## B.Com Third semester

| Paper Number | Subject | Course |
|---|---|---|
| I | English | Compulsory |
| II | Marathi / Hindi | Second Language |
| III | Corporate Account- I | Core Discipline |
| IV | Cost Account - I | Core Discipline |
| V | I.T. Application in Business- I | Core Discipline |
| VI | GST Account - I | Ability Enhancement |
| VII | Banking or<br>Marketing Management or<br>Financial Management or<br>Indian Economy | Discipline<br>Specific<br>Elective<br>(Any One) |



Scanned by TapScanner

# B.C.A. (Bachelor of Computer Application)

A candidate who has passed in H.S.C.(Arts/Science/MCVC/ Commerce) Examination from Maharashtra State Board of Secondary Education, Pune or any other examination equivalent there to, is eligible to join first semester of Bachelor of Computer Application (B.C.A.) course.

Get to know the B.C.A.(Bachelor of Computer Application)

The Bachelor of Computer Application shall be conferred on a candidate who has completed a regular course of study consisting of three years (Six - Semester) in the relevent subject as prescribed and has appeared at and passed in all examinations prescribed for |Bachelor of Computer.

## B.C.A. (Bachelor of Computer Application)

- Computer Software, Hardware Laboratory
- 30 (Intel P-IV) Machines Connected through Net-working.
- Broad Band Internet Facility
- Web Cams
- Scanner
- Printer (Laser, Color, Dot Matrix)
- Highly qualified and experienced staff
- Electronics Kits

## Departmental Activites :

- Seminars and Conferences are arranged on
- Various and latest topics.
- Industrial tour, Visits are arranged per year
- English language Lab

## Library :

- Library is a soul of Educational Institute"
- Every Library plays very vital role in educational field.
- We have a well - stocked library.
- E - Library.



Scanned by TapScanner

# विज्ञान शाखा

* बी.एस्सी प्रथम वर्ष

अ) अनिवार्य विषय (Compulsory Subjects)

1) English 2) Marathi / Hindi (S.L.) 3) Computer Sci. (Compulsory

ब) ऐच्छिक विषय (Optional Subjects)

1) Chemistry, Zoology, Botany
2) Physics, Computer Science, Maths.
3) Physics, Chemistry, Maths.
4) Computer Science, Zoology, Botany.
5) Microbiology, Zoology, Botany.
6) Physics, Chemistry, Computer Science.

टिप :- • Computer Science या विषयासाठी प्रती वर्ष रू.५०००/-

• Microbiology या विषयासाठी प्रती वर्ष रू.७०००/- रू. शुल्क आकारले जाईल.

* बी.एस्सी. द्वितीय वर्ष

अ) अनिवार्य विषय

१) इंग्रजी २) मराठी/हिंदी/(द्वितीय भाषा) ३) पर्यावरणशास्त्र व

बी.एस्सी. प्रथम वर्षाचेच ऐच्छिक विषय बी.एस्सी. द्वितीय वर्षासाठी राहतील.

* बी.एस्सी. तृतीय वर्ष

प्रथम द्वितीय वर्षासाठी घेतलेले तीन ऐच्छिक विषय बी.एस्सी. तृतीय वर्षासाठी राहतील.

* **महत्वाची सूचना (कला व विज्ञान दोन्ही शाखेसाठी)**

१) जो विषय द्वितीय भाषेसाठी निवडला आहे, तो ऐच्छिक म्हणून घेता येणार नाही, याची नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी.

२) ज्या विषयाला १५ किंवा अधिक विद्यार्थी नसतील, त्या विषयाची परीक्षा विद्यापीठ घेणार नाही. अशा विषयांसाठी प्रवेशित विद्यार्थ्यांना दुसऱ्या विषयाची निवड करावी लागेल. (प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी)

३) बी.ए. बी.एस्सी. तृतीय वर्षासाठी प्रवेश घेण्यासाठी प्रथम वर्षाचे सर्व विषय पास असणे आवश्यक आहे.

४) बी.कॉम सिलॅबस

टीप :- एकदा निवडलेले विषय पुन्हा बदलता येणार नाहीत.



Scanned by TapScanner

# विशेष सूचना

*	पर्यावरणशास्त्र

अ)	भारताच्या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विद्यापिठाने शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून बी.ए. द्वितीय व बी.एस्सी, द्वितीय वर्षातीलविद्यार्थ्यांसाठी पर्यावरणशास्त्र (Environmental Science) हा विषय १०० गुणांकरिता पदवी अभ्यासक्रमासाठी अनिवार्य केला आहे.

सदर विषयाचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांनी द्वितीय वर्षी पूर्ण करावयाचा आहे. त्यासाठी शैक्षणिक फी म्हणून रू.१००/- व परीक्षा फी रू.५०/- नियमीत फिस शिवाय जादाचे भरावयाचे आहेत. सदर अभ्यासक्रम ५० तासिकांचा असून पैकी ४५ तासिका व्याख्यानासाठी व ५ तासिका प्रकल्प मार्गदर्शनासाठी आहेत.

*	संगणकशास्त्र :- Compulsory Computer Course

ब)	शैक्षणिक वर्ष सन २००५-२००६ पासून विद्यापीठाने प्रथम वर्षाच्या
→ विद्यार्थ्यांसाठी संगणक प्रशिक्षण अभ्यासक्रम (Computer Course)
→ अनिवार्य केलेला आहे. याबाबतच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१)	सदरहु अभ्यासक्रम सर्व शाखांमधील (कला व विज्ञान) विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य (Compulsory) आहे.

२)	प्रथम वर्षाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम पूर्ण करणे अनिवार्य आहे.

३)	सदरहू अभ्यासक्रम तृतीय वर्षापर्यंत पूर्ण करता येईल. तथापि सदरहू अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र प्राप्त केल्याशिवाय तृतीय वर्षाची परीक्षा देण्यास संबंधित विद्यार्थी पात्र ठरणार नाही.

४)	या विषयामधून खालील पैकी पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांची सूट आहे.
१) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असलेले विद्यार्थी.
२) ज्यांना बी.एस्सी. ला. संगणक विषय आहे असे विद्यार्थी

टीप :- पर्यावरणशास्त्र व संगणकशास्त्र विषयांची परीक्षा विद्यापीठ नियमानुसार घेण्यात येईल.



Scanned by TapScanner

# इ.बी.सी. सवलत सूचना

अ) इ.बी.सी. सवलतीसाठी खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. (दोन प्रतीमध्ये)

१) नादारी (इ.बी.सी.) अर्ज प्रथम प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी

२) मागील वर्षाच्या उत्पन्नाचे तहसीलदारांचे प्रमाणपत्र.

३) कुटूंब मर्यादा प्रमाणपत्र.

४) द्वितीय व तृतीय वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्यांनी इ.बी.सी. सवलत पुढे चालू ठेवण्यासाठी असणारा अर्ज करावा.

५) ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे मागील वर्षाचे उत्पन्न रू.२,५०,०००/- पेक्षा कमी आहे, अशाच विद्यार्थ्यांना सदरील सवलतीसाठी पात्र समजले जाईल.

६) ज्या विद्यार्थ्यांचे पालक (आई व वडिल) हयात नसतील त्यांनी पालक हयात नसल्याचे प्रमाणपत्र दोन प्रतीत जोडावे.

७) शिक्षण घेत असताना खंड पडला असल्यास त्या वर्षात काय केले त्यासंबंधीचे तहसीलदाराचे प्रमाणपत्र गॅप सर्टिफिकेट (मध्यंतराचा दाखला) जोडावा.

८) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर त्वरीत नादारी (इ.बी.सी) अर्ज व इतर प्रमाणपत्रे व्यवस्थित भरून दाखल करावीत.

९) विद्यार्थ्यांचे वडील अथवा पालक नौकरी करीत असतील तर ती नौकरी कशा प्रकारची आहे, पगार इत्यादी संबंधीचे प्रमाणपत्र व्यवस्थित भरून दाखल करावेत.

१०) मागील वर्षाचे इ.बी.सी. मंजूरी आदेश क्रमांक, प्रमाणपत्र जोडावे. वरील सर्व प्रमाणपत्रे प्रवेश अर्जासोबत जोडून द्यावीत. इ.बी.सी. मंजूर न झाल्यास संपूर्ण शुल्क आकारले जाईल याची नोंद घ्यावी.

११) डोमीसाईल प्रमाणपत्र.



Scanned by TapScanner

ब) प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या मुला मुलींना मिळणारी सवलत

ज्या विद्यार्थ्यांचे पालक (आई - वडिल) प्राथमिक शिक्षक असतील व ज्यांना या सवलतीसाठी अर्ज करावयाचा असेल, त्यांनी प्रवेश अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत.

⟶ प्राथमिक शिक्षकांच्या मुला मुलींना मिळणाऱ्या सवलतीचा अर्ज दोन प्रतीत.

⟶ नोकरीचा दाखला (गट शिक्षणाधिकारी यांच्या स्वाक्षरीचा) दोन प्रतीत.

⟶ कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र (दोन प्रतीत)

⟶ गुणपत्रकाची साक्षांकित प्रत (दोन प्रतीत)

क) भारत सरकार शिष्यवृत्ती

* **बी.ए. व बी.एस्सी प्रथम वर्षासाठी** : भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी (GOI Scholarship) अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील कागदपत्रांची पूर्तता करणे गरजेचे आहे.

१) प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी नवीन अर्ज

२) जातीच्या प्रमाणपत्राच्या दोन साक्षांकित प्रती.

३) टी.सी. (विद्यालय / महाविद्यालय सोडल्याचा दाखला) च्या साक्षांकित प्रती.

४) मार्क मेमोची (गुणपत्रीका) साक्षांकित प्रत (पास झालेल्या वर्गाची)

५) उत्पन्नाचा दाखला तहसिलदार यांची मूळ प्रत.

६) अपत्य प्रमाणपत्र.

७) पालक असल्याचे प्रमाणपत्र (जर आई वडील हयात नसतील तर)

८) जिल्हा बदल प्रमाणपत्र (इतर जिल्ह्यातून आल्यास)

९) मागील वर्षाचे शिष्यवृत्तीचे प्रमाणपत्र (इतर महाविद्यालयातून आलेले असल्यास)

१०) ओळखपत्र (आयकार्ड) व पासपोर्ट साईज स्वतः चे प्रत्येकी एक छायाचित्र (फोटो)

११) शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी उस्मानाबाद शहरातील बँक ऑफ महाराष्ट्र शाखा आनंद नगर येथे स्वतः चे खाते उघडणे आवश्यक आहे.

१२) डोमीसाईल प्रमाणपत्र.



Scanned by TapScanner

II) बी.ए. बी.एस्सी द्वितीय व तृतीय वर्षासाठी आवश्यक कागदपत्रे -

१) जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत.

२) मार्क मेमोची (गुणपत्रिका) साक्षांकित प्रत.

३) ओळखपत्र (आयकार्ड) व पासपोर्ट साईज स्वतः चे प्रत्येकी एक छायाचित्र (फोटो)

* टिप :-

१) विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फॉर्म ऑनलाईन भरून कागदपत्रासह कार्यालयात जमा करावे.

१) भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी वार्षिक उत्पन्न रू.१,००,०००/- पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

२) वरील प्रकारची सर्व कागदपत्रे शिष्यवृत्ती फॉर्म सोबत न जोडल्यास शिष्यवृत्ती मंजूर न झाल्यास महाविद्यालय त्यास जबाबदार राहणार नाही.

ड) बी.सी. फ्री शीप बाबत (मागासवर्गीय)

ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रू.१,००,०००/- पेक्षा जास्त आहे, अशा विद्यार्थ्यांनी या सवलतीसाठी विहित नमुन्यामध्ये अर्ज करावा. तसेच एकदा अनुत्तीर्ण होऊन प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनाही या सवलतीचा अर्ज करता येईल.

इ) स्वातंत्र्य सैनिक (**Freedom Fighter**)

ज्या विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य सैनिकांची शिष्यवृत्ती मिळते, अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासोबत वखालील पूर्ततेसाठी आपले अर्ज प्रत्येकी दोन प्रतीत विहीत नमुन्यात सादर करावेत.

* प्रवेशा बाबत :-

विद्यापीठ परिपत्रकात दिलेल्या प्रवेशाच्या मुदतीतच विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा. विद्यार्थ्याला प्रवेश देण्याचा अगर नाकारण्याचा संपूर्ण अधिकार प्राचार्याकडे राहील. त्यांचा याबाबतचा निर्णय अंतिम राहील.

## * प्रवेश रद्द करणे बाबत :

अ) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश रद्द करावयाचा असल्यास त्यास नियमानुसार महाविद्यालयाची प्रथम सत्राची संपूर्ण फी भरावी लागेल. त्यास महाविद्यालयाच्या सदरील काळाचा दाखला देण्यात येईल. परंतु कोणत्याही कारणास्तव प्रवेशाच्या वेळी महाविद्यालयाकडे देण्यात आलेली मूळ प्रमाणपत्र व त्याच्या सत्यप्रती प्रवेश रद्द केल्यानंतर मिळणार नाही.



Scanned by TapScanner

ब) तृतीय वर्ष पास झाल्यानंतर अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे शिक्षण बंद केल्यास ३ महिन्याच्या आत टी.सी. घेवून जावी. त्यानंतर प्रतीवर्ष १००/- याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

क) या महाविद्यालयातील आपला प्रवेश रद्द करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी दाखला मागणीचा अर्ज दिल्यानंतर खालील बाबीची पूर्तता केल्यानंतरच तिसऱ्या दिवशी दाखला मिळेल.

१) कार्यालयीन देय   २) ग्रंथालयीन देय   ३) प्रयोगशाळा देय
४) परीक्षा विभाग देय   ५) क्रीडा विभाग देय   ६) राष्ट्रीय सेवा योजना देय.

* अनामत रक्कम परतीबाबत :-

१) अनामत रक्कम (Deposite) परत मागणीच्या अर्जासोबत अनामत रक्कम भरल्याची पावती (Receipt ) जोडणे आवश्यक आहे.

२) महाविद्यालय सोडल्यानंतर १५ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर या काळातच अनामत रक्कम परत केली जाईल.

३) अनामत रक्कम (Deposite) परत मागणीचा अर्ज दिल्यानंतर तीन दिवसांनी रक्कम परत मिळेल.

४) महाविद्यालय सोडल्यापासून तीन वर्षाच्या मुदतीनंतर अनामत रक्कम (Deposite) परत केले जाणार नाही.

## * मुलींचे वसतीगृह

मुलींसाठी वसतीगृहाची सोय आहे. प्रथम अर्ज करणाऱ्या विद्यार्थीनींना प्राधान्य दिले जाईल. प्रवेश देणे अथवा न देणे अंतिमतः संस्थेच्या अधिन राहील.

## * राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.)

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे २०० विद्यार्थ्यांचे एकक कार्यरत आहे. सामाजिक जाणीवा निर्माण करणारा आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी प्रयत्न करणारा विभाग म्हणून या विभागाची ओळख आहे. प्रामाणिक, होतकरू व सेवा करण्याची तळमळ असणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेत सहभागी होता येते.

या विभागाचे ०७ दिवसाचे निवासी शिबीर दरवर्षी ग्रामीण भागात आयोजित केले जाते. शिबीरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध उपक्रमात प्रत्यक्ष सहभागी करून घेतले जाते. या शिबीरातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ व राज्य पातळीवरील शिबीरासाठी पाठवले जाते.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण, रेड रिबन क्लब, श्रम संस्कार, वृक्षारोपन, सर्वेक्षण, सहल इ. उपक्रम घेतले जातील.



Scanned by TapScanner

## महाविद्यालयीन शिस्त

१) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर महाविद्यालयातील शिस्त व शैक्षणिक वातावरणास बाधा येईल असे वर्तन केल्यास संबंधित विद्यार्थी शिक्षेस पात्र राहील.

२) ओळखपत्राविना महाविद्यालयात प्रवेश करू नये.

३) सूचना फलकावरील वेळोवेळी लिहिलेला मजकूर विद्यार्थ्यांनी नियमित वाचावा ती जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे.

४) महाविद्यालयीन कामकाजाच्या दिवसाच्या ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे. अन्यथा होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित विद्यार्थी जबाबदार राहील.

५)महाविद्यालयाअंतर्गत होणाऱ्या सर्व परीक्षांमध्ये आपली उपस्थिती अनिवार्य आहे. अन्यथा संबंधितावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

६) वर्गाध्यापन सुरू असताना वर्गात पूर्ण वेळ बसणे विद्यार्थ्यांस बंधनकारक राहील.

७) वर्गाध्यापन चालू असताना अध्यापन कक्षाबाहेर इतर विद्यार्थ्यांनी रेंगाळू नये, तसेच तासिका संपण्यापूर्वी वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यांस भेटता येणार नाही.

८) महाविद्यालयाच्या परिसरात गुटखा, तंबाखू आदि पदार्थांचे सेवन करणे किंवा जवळ बाळगणे हा कायद्याने गुन्हा आहे असे प्रकार आढळल्यास संबधित विद्यार्थ्यांचे नाव महाविद्यालयातून कमी करण्यात येईल.

९) वर्गाध्यापन सुरू असताना वर्गात भ्रमणध्वनीचा कोणत्याही प्रकारचा वापर केल्यास तो शिस्तभंग समजण्यात येईल तसेच महाविद्यालय परिसरात अध्यापन सुरू असताना भ्रमणध्वनीवर बोलण्याची अनुमती नाही.

१०) रॅगिंग बद्दल : प्रवेशासाठी येणारा विद्यार्थी / विद्यार्थ्यांनी यापूर्वी रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेला असेल तर त्याला प्रवेश नाकारण्यात येईल किंवा प्रवेश दिल्यानंतरही असे निदर्शनास आले की, सदर विद्यार्थी रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेला होता तर त्याला निष्कासित करण्यात येईल. रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विरोधात संस्थेमार्फत स्थानिक पोलिसांकडे एफ.आय.आर. (FIR) दाखल केला जाईल व रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांस / विद्यार्थीनीस निष्काषित करण्यात येईल. परिपत्रक क्र.संकिर्ण २००५ २३८/०५ दिशि-०१ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ दि.१८ जुलै २००७.

११) टि.सी. काढण्यासाठी अर्ज केल्यानंतर तीन दिवसांनी टि.सी. मिळेल तसेच टि.सी. काढण्यासाठी विलंब झाल्यास प्रतिवर्ष १०० रूपये याप्रमाणे विलंब शुल्क आकारले जाईल.

## स्नेहसंमेलन व इतर उपक्रमाबाबत

१) स्नेहसंमेलन घ्यावयाचे किंवा नाही या संदर्भातील अंतिम निर्णय मा.प्राचार्य यांचा राहील. या संदर्भात विद्यार्थ्यांचे मत विचारात घेतले जाणार नाही.

२) स्नेहसंमेलनाअंतर्गत होणारे सर्व उपक्रम/कार्यक्रम मा.प्राचार्यांनी सुचविल्याप्रमाणेच राहतील.

३) स्नेहसंमेलन किंवा महाविद्यालयाच्या कोणत्याही उपक्रमात विद्यार्थ्यांकडून शिस्तीचा भंग झाल्यास सदर उपक्रम वा कार्यक्रम तात्काळ रद्द करण्यात येईल व संबंधितावर कारवाई करण्यात येईल.

४) वर्ग प्रतिनिधी, विद्यार्थी परिषद पदाधिकारी यांची निवड विद्यापीठ निकषानुसार करण्यात येईल.

५) संस्थेच्या धोरणानुसार महाविद्यालयीन स्नेहसंमेलन संस्थेच्या कै.प्रमोदजी महाजन सांस्कृतिक सभागृहात आयोजित केले जाईल.



Scanned by TapScanner

# STRUCTURE OF FEES

| Sr. No. | Particulars | B.A. - (कला शाखा) | | | B.Sc. - (विज्ञान शाखा) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | B.A. I | B.A II | B.A. III | B.Sc. I | B.Sc. II | B.Sc. III |
| 1 | Entry Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 2 | Laboratory Fees | 300 | 300 | 300 | 3000 | 3000 | 3000 |
| 3 | Tution Fees | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 |
| 4 | Library Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 5 | Enrollment Fees (Eligibility) | 50 | -- | -- | 50 | -- | -- |
| 6 | Gymkhana Fees (Sports Fees) | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 7 | Extra Curriculum Activity Fees | 56 | 56 | 56 | 56 | 56 | 56 |
| 8 | College Magzine Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 9 | Computer Training Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 10 | Registration Charges | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 11 | University Development Fund | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 |
| 12 | University Sports Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 13 | University Ashwamedh Fund | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 |
| 14 | University Medical Aid Fund | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 15 |
| 15 | University Student Welfare Fund | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 16 | University Student Insurance Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 17 | Youth Festival Charges | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 18 | Student ID Charges | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 19 | Semester Fees | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 |
| 20 | Sesson Fees | 100 | – | – | 100 | – | – |
| 21 | Study Tour Fees | – | 100 | – | – | 100 | – |
| | **Total Fees** | **1935** | **1885** | **1785** | **4635** | **4585** | **4485** |



Scanned by TapScanner

# STRUCTURE OF FEES

| Sr. No. | Particulars | B.Com. - (वाणिज्य शाखा) | | | Bachelor of Computer Application | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | B.Com. I | B.Com. II | B.Com. III | B.C.A. I | B.C.A. II | B.C.A. III |
| 1 | Entry Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 2 | Laboratory Fees | 300 | 300 | 300 | 10000 | 10000 | 10000 |
| 3 | Tution Fees | 1600 | 1600 | 1600 | 13000 | 13000 | 13000 |
| 4 | Library Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 5 | Gymkhana Fees (Sports Fees) | 56 | 56 | 56 | 50 | 50 | 50 |
| 6 | Extra Curriculum Activity Fees | 50 | 50 | 50 | 56 | 56 | 56 |
| 7 | College Magzine Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 8 | Computer Training Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 9 | Registration Charges | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 10 | University Development Fund | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 |
| 11 | University Sports Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 12 | University Ashwamedh Fund | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 |
| 13 | University Medical Aid Fund | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 15 |
| 14 | University Student Welfare Fund | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 15 | University Student Insurance Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 16 | Youth Festival Charges | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 17 | Student ID Charges | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 18 | Semester Fees | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 |
| 19 | Enrollment Fees (Eligibility) | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 20 | Sesson Fees | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 21 | Study Tour Fees | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| | **Total Fees** | **2835** | **2835** | **2835** | **23885** | **23885** | **23885** |



Scanned by TapScanner

# परीक्षा पध्दत (Exam Pattern)

डॉ.बा.आं.म.विद्यापीठाने २००९-१० पासून बी.ए आणि बी.एस्सी प्रथम वर्ष २०१०-२०११ पासून बी.ए आणि बी.एस्सी व द्वितीय वर्षाला २०११-२०१२ पासून बी.ए व बी.एस्सी तृतीय वर्षाला सेमिस्टर सत्र परीक्षा पध्दती लागू केली आहे.

बी.ए./बी.कॉम / बी.एस्सी प्रथम वर्ष / द्वितीय वर्ष / तृतीय वर्ष

२००९ - १० पासून सेमिस्टर सत्र परीक्षा पध्दती लागू केली आहे. प्रत्येक पेपर ५० गुणांकरिता असेल. सेमिस्टर एक व सेमिस्टर दोन असे एकूण दोन सेमिस्टर बी.ए. व बी.एस्सी. प्रथम वर्षाकरिता आहेत. सेमिस्टर तीन व चार असे एकूण दोन सेमिस्टर बी.ए व बी.एस्सी द्वितीय वर्षाकरिता तसेच सेमिस्टर पाच व सहा असे दोन सेमिस्टर बी.ए व बी.एस्सी तृतीय वर्षाकरिता असतील.

परीक्षा संबंधी :- महाविद्यालयामार्फत दोन्ही सत्रात सराव परीक्षा घेतली जाते.

* प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी सराव परीक्षा देणे अनिवार्य राहील.
* फिस विद्यार्थ्यांनी विद्यापीठामार्फत दिलेल्या मुदतीत भरावी.
* मागील वर्षी नापास झालेले अथवा ए.टी.के.टी मिळालेले विद्यार्थी ऑक्टोबर महिन्यामध्ये होणाऱ्या परीक्षेस बसू शकतात.



Scanned by TapScanner

* ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या परिक्षेची फिस साधारणतः ऑगस्ट महिन्यात भरायची असते.

* विद्यापीठाने दिलेल्या ठराविक मुदतीत परीक्षा फिस न भरल्यास नियमानुसार दंडासहित परीक्षा फी भरावी लागेल.

* विशिष्ट मुदतीत दंडासहित रक्कम न भरल्यास परीक्षेस बसता येणार नाही.

* सेमिस्टर सत्र परीक्षेची परीक्षा फॉर्म भरण्याची तारीख साधारणतः ऑगस्टचा २ रा किंवा ३ रा आठवडा प्रथम सत्रासाठी व डिसेंबरचा २ किंवा ३ आठवडा द्वितीय सत्रासाठी.

---

* महाविद्यालयामध्ये शासन धोरणानुसार अँटी रॅगींग समिती कार्यरत आहेत.

* विद्यार्थीनीच्या सुरक्षेसाठी व तक्रार निवारणासाठी महिला कक्ष / विशाखा समिती कार्यरत आहे.

विशेष सूचना :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादच्या www.bamu.ac.in या वेबसाईटवर अभ्यासक्रम उपलब्ध असून वेळोवेळी त्यामध्ये होणारे बदलही पाहता येतील.

****************************************



Scanned by TapScanner